म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २५३३



# एहसास की वादियाँ

# अनुभूतिच्या दऱ्या

श्रध्दा मधुकर 'सूफी'

सं. काव्यसंदर्भ काव्य
२५३३
३७८४८

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

19 MAR 1986

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

# अनुभूतिच्या दऱ्या

# एहसास की वादियाँ

श्रद्धा पराते

सूफी

श्रीविशाखा प्रकाशन

५८, शनवार पेठ, पुणे ३०.

प्रकाशक :
राजा फडणीस
श्रीविशाखा प्रकाशन
५८, शनवार पेठ, पुणे ३०.

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ, पुणे ३०.

© श्रद्धा पराते
आगाराम देवीसमोर
नागपूर

प्रथमावृत्ती : १८ सप्टें. ८५

मुखपृष्ठ : सुभाष अवचट, पुणे.

मूल्य वीस रुपये

प्यासों के नाम

---

तृषार्तास्

अनुभूतिच्या गहिऱ्या दऱ्यांमधुन
न जाणे कशी
पैंजण वाजवीत, गुणगुणत
कधी हृदयातील रहस्याचा...
भेद घेत फुसफुसत
डोळ्यांत भरलेले मेघ घेऊन
कधी उदास खळखळणारे
हसू घेऊन, तर कधी
सागरलाटांसारखी उसळत
तरी नकळत चुपचाप
हलकेच उतरते गजल
अंतरात...

एहसास की गहरी वादियों से
निकलकर नही मालूम
किस तरह
पाजेब झनझनाती
गुनगुनाती
कभी राजदाँ बन
सरगोशियाँ करती
आँखोमे भरेसे बादल लिए
कभी मायूस खिलखिलाहट के साथ
और कभी समंदर की मौजोंसी
अठखेलियाँ करती
लेकिन फिर भी चुपके से अनजाने
उतर आती है गजल
मेरे जेहन मे

— श्रद्धा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २५३३
काव्य २०८४७
२१।१२।८५
शाखा (स्थक ग्रं)

# अनुभूतिच्या दऱ्या

# एहसास की वादियाँ

स्वप्नांच्या झरोक्यात आकांक्षांची वस्ती
दऱ्या, डोंगर, आसमंत
आणि हा साराच परिसर
दुःखात चूर
सकाळ गहिरी उदास
बसलेय कोणी
आग पेटवून...
बर्फाच्छादित पर्वतांवर.
निबिड अरण्याच्या आश्रयाला,
कोणी अनामिक लुटेरा राहातोय...!
अशा अनामिक तृषार्ताच्या नावे
हे कवी
तू लिही काहीतरी
प्रेमाचाच तर प्रकाश आहे केवळ,
दुनियेच्या अंधार साम्राज्यात.
रात्र एखाद्या मदनिकेसारखी
उभी आहे दारात उन्मुक्त...
गहन केशसंभार सोडून मुक्त स्कंधांवर,
मदहोश करणारी...
जादूची धून वाजवतोय...
हा कोण सपेरा...?
या नागिणींना मुग्ध करण्यासाठी.
या मादक हवेतही,
घोळ जरा मदिरा...
हे मदिरा देणाऱ्या साकी...!
अंतरीची अवस्था ही
अशीच मस्त गहिरी आहे.

ख्वाबों के झरोंखों मे अरमाँ का बसेरा है
गमगीन है वादी ये पुरसोज सबेरा है

कोई आग जला बैठा बर्फीले पहाडोंपर
जंगल की पनाहोंमे गुमनाम लुटेरा है

प्यासों के नाम तू भी शायर कलाम लिख दे
तारिक फजाँओं मे उल्फत का उजेरा है

है रात खडी दरपे शानों पे डाले गेसूँ
जादू की धुन बजाये ये कौन सपेरा है

कुछ घोल दे मय साकी सरशार सबाओं मे
अंदर की हालतों का आलम भी घनेरा है

स्वप्नांशी झुंजत राहिले जीवन रात्रभर
डोळ्यांतून बरसत राहिले जीवन रात्रभर
मान झुकवून विवशतेसमोर असहायपणे
हुंदके देत राहिले जीवन रात्रभर आठवणींत विव्हळ
दर्पणाशी झाला ज्या क्षणी...
जीवनाचा साक्षात्कार तेव्हा, नव्हे, त्याच क्षणी
उजाड उद्‌ध्वस्त प्रतिबिंब दर्शनाने स्वतःच्या
स्वतःतच असलेल्या वाळवंटातील मृगमरिचिकेत
भटकत राहिले जीवन रात्रभर...
शोध घेत स्वतःचाच,...
दुःखव्याकूळ उरातील अनंत आकांक्षांना
करून दफन, जळत राहिले जीवन रात्रभर
तप्त निःश्वासांच्या दाहक ज्वालांत
प्रकाशाची अनंत आमंत्रणे विसावलीत जेव्हा
पापण्यांच्या छायेत श्रांत होऊन,
हे जीवन तेव्हा कुंतलांच्या घन आश्रयात
सुगंधित होत राहिले रात्रभर मदहोशपणे
अनंत अनिवार आकांक्षांचा सुदीर्घ प्रवास हे जीवन
सारी रात्र आयुष्याची...
वाहूतून असे निसटतच राहिले हे जीवन...
सारी रात्र...रात्रभर
संपूर्ण आयुष्याची जणू एकच रात्र
दीर्घ एकांतिक ...
जीवन स्वतःवरच
आता इतके आसक्त झालेय
की त्या नशेतच
वहकत राहिले रात्रभर

जिंदगी ख्वाँबों से उलझी रातभर
जिंदगी आँखो से टपकी रातभर

सर झुकाये बेबसी की शान मे
जिंदगी यादों मे सिसकी रातभर

सामना जब आईने से हो गया
जिंदगी सहरा मे भटकी रातभर

दर्दे-दिल की ख्वाहिशों को दफ्नकर
जिंदगी आहों मे दहकी रातभर

सो गये जब उजाले पलकों तले
जिंदगी जुल्फों मे महकी रातभर

जिंदगी चाहों का इक तनहा सफर
जिंदगी बाहोंसे फिसली रातभर

'सूफी, अब ये हो गई खुदआश्ना
जिंदगी बेखुद सी बहकी रातभर

सारी रात्र कुणाची आठवण येत राहिली
साऱ्या रात्रीवर कुणाचा उन्माद पसरलाय
सारी रात्र तुझ्या कल्पनांत जागून काढलीय
सारी रात्र आठवलाय गेलेला काळ
हाय...! कुठल्या मुक्कामावर येऊन भेटावेस तू आम्हाला
संपूर्ण आयुष्याच्या प्रवासातील
प्रत्येक वळण या वेळी आठवलेय
तुझी अनिमिष नजर
प्रत्येक जखम नवीन करून गेलीय...
हिरवी करून गेलीय...
आणि या अशावेळीच...
स्वतःच्याही संकोचशील दृष्टीतील
लज्जादेखील प्रकर्षाने आठवत राहिलीय
अपराध करून अनागता...!
जगात कोणी सुखी झालेय का कधीतरी...?
आणि हे कळून देखील
त्या अनुभूतीच्या प्रत्येक क्षण न क्षणाचा उत्सव
आठवणीत सजीव झालाय
ऋतुराजाची बहारच जणू...
दिव्य ईश्वरी प्रकाशाच्या पालखीत बसून आली होती
किती अद्‌भुत जादूभरे ते क्षण
त्या प्रत्येक क्षणाचा तो सुरम्य प्रवास
तुझ्या कल्पनेत रमताना
जसाच्या तसा आठवतोय परत...परत...

तमाम रात ये किसका खयाल आया है
तमाम रात पे किसका सुरूर छाया है

तमाम रात गुजारी है तसव्वुर मे तेरे
तमाम रात गया वक्त याद आया है

ये किस मकाम पे तुम आके मिले हमसे
तमाम उम्र का हर मोड याद आया है

हरेक जख्म नया कर गई निगाह तेरी
हिजाब अपनी नजर का याद आया है

गुनाह करके कब पा सका सुकूं है कोई
हरेक गुनाह का वो जश्न याद आया है

बहार नूर के डोले मे बैठ आई थी
वो हर लम्हा वो सफर फिर याद आया है

खूप एकटे वाटू लागले, तुझी भेट झाली अन्
ऐकलेपणाचे दुःख हे, किती आपलेसे झाले !
पाहुणी झालीत जगातील सर्व दुःखे ज्यासमक्ष...
प्रीतीची रीतच विलक्षण...!
मनाचे सुख चैन हिरावणाऱ्या
शत्रूची आकांक्षा...
प्राणांहून प्रीय व्हावी ना...!
आकांक्षा उद्दाम होऊन
पूर्ण यौवना झाल्यावर
विरहाग्निने, तप्त निःश्वासदेखील
रोमरोमी लहरणाऱ्या उन्मादक गीतासारखे जाणवावेत
चंद्र हृदयी धरण्याची कल्पनाही केवळ अशक्य
पण, प्रत्यक्ष किती अघटित
माझ्या बाहूतील चंद्रदर्शनाने
प्रत्यक्ष चंद्रही स्तिमित झालेला दिसतोय
घनदाट केस असे मुखावर पसरू नकोस
या तुझ्या विभ्रमांनी
रात्र अधिकच गहिरी अन्
तृषार्त होऊ लागलीय
दीपशिखा नववधूसारखी, लज्जेने आरक्त... अन् उद्दीप्त वाटतेय
ओठांना चुंबून प्रत्यक्ष तृषाच जणू आज म्हणतेय
या ओठांची तृष्णा हरणारे चषकदेखील
स्वतःच अत्यंत तृषित वाटताहेत आज

तुमसे मिलकर बहुतही तनहा लगे
गम जहाँ के सभी आज महमाँ लगे

यह अंदाजे उल्फत् भी क्या खूब ह
जान से बढके दुश्मन का अरमाँ लगे

आरजू जब मचलकर जवाँ हो गई
गर्म आहें लरजता सा नग्मा लगे

चांद पहलू मे हो ये सोचा था कब
चाँद को देखकर चाँद सहमा लगे

मत जुल्फे बखेरो यूं रूखसार पे
रात प्यासी औ, दुल्हन सी शम्मा लगे

प्यास लब से लिपटकर ये कहने लगी
प्यासे प्यासे खुद आज पैमाँ लगे

यावे निवांत एकांताचे वेळी कधी
स्वप्नात तरी येऊन जावे कधी
रोजच जाणवते ही संध्या
गहन उदास...एकाकी,
पसरून जा क्षितिजावर
प्रीतीच्या दिव्य प्रकाशाची शोभा
माझी उदास एकाकी संध्या, न्हाऊन तुझ्या
दिव्य प्रकाशाच्या रेशमी किरणांत
रंगून जाईल अंतर्बाह्य
पृथ्वीवरील अनंत दुःखे भरून आहेत हृदयात
काय बोलायचे त्याविषयी...
ऐकवत चल नक्षत्रांच्या गोष्टी तू येऊन तरी
राजसा...!
हे जीवन म्हणजे चोहींकडून नुसता उन्हाळा
ही आंच शीतल जाणवावी म्हणून तरी
तू गात जा श्रावणाची गीतं
अवघ्या पृथ्वीच्या परिसरात आणि ह्या आसमंतात
सुगंध दरवळतोय प्रियाचाच...!
किती सांगायचे या एकाकी मनाला
नको हे झुरणे...तू भरून घे हा मत्त गंध
आपल्या आर्त निःश्वासात...

कभी तनहाईयों मे भी आया करो
अजी ख्वॉबों मे आकर ही जाया करो

साँझ तनहा सी लगती है रोज ही
नूर अपना उफक पे बिछाया करो

गम जमीं के है दिल मे समाये हुये
तुम सितारों की बातें सुनाया करो

जिंदगी हर तरफ हैं तपन ही तपन
इसलिये गीत सावन के गाया करो

श्रद्धा, गुलशन मे हर सू है उनकी महक
तुम भी आहों मे खुशबू बसाया करो

रात्र ढळत राहिली, आयुष्य चालत राहिले
जीवन विरघळत राहिले आसवांत...
क्षणभराच्या सुखासाठी
दुःखांचे जगणे केवळ
काळाची नाडी निसटत गेली अशीच हातून
जीवनात...
तसे सारेच काही मिळाले
पण...
प्राणात मौन मंथर जळणारी
एक ज्वाला...!
तशीच जळत राहिलीय निरंतर मौन निःशब्द
या माझ्या
तप्त, कटु गीतांची शपथ तुला वाऱ्या,
ऐन श्रावणातही
पेटलच राहिलीय प्रीत
प्रकाशाच्या प्रवासात सारेच सोबती
अंधाराचा प्रांत मात्र निर्जन
वेडी आशाच मनीची
छळत राहिली आम्हास
पौर्णिमेचा चंद्र रात्रीपासून दुरावला अन्
विवश आकांक्षा मीलनाची
आतच तळमळत राहिली
सारेच परिवर्तनशील...! या प्रदेशात,
ऋतूही ओठांवर जळती गीतं घेऊन
बदलत राहिलेत

रात ढलती रही उम्र चलती रही
जिंदगी आँसुओं मे पिघलती रही

गम जिये एक पलकी खुशीके लिये
वक्त की नब्ज यूंही फिसलती रही

सभी कुछ मिला जिंदगी से मगर
एक शम्मा जिगर ही मे जलती रही

तल्ख नग्मों की तुझको कसम ए हवा
चाह सावन मे भी सुलगती रही

रोशनी के सफर मे हुये हमसफर
तारिकी मे मगर आस छलती रही

चाँद पूनम का शब् से जुदा हो गया
वस्ल की आरजू बस मचलती रही

सूफी, होठों पे जलते नगमान से
इस चमन मे फिजाँएं बदलती रही

एक शहर आमचेही... निर्जन किनाऱ्यांवर...
तारुण्य व्यतीत केलेय असेच आम्हीही
पापण्यांत दडवलीत नेहमीच, अनावर समुद्री वादळे
नितांत एकांताच्या क्षणी, मात्र
नेहमीच आर्त साद घातलीय लाटांनी
वाद्यांनी नाकारले जरी दरवेळी
गीतांनी सावरलीय शृंगारलीय
अंतरातील प्रीतीची, आकांक्षांची...
उदास विराण दुनिया
रडलो तरी निःशब्द निःस्वर... प्रियाच्या बाहूत...
ती रात्र स्मरणात !
प्रत्येक घाव उरातील कुंवार राहिलाय
त्या रात्रीच्या अपेक्षेत...अजूनही
नाहीच खरे जगव्यवहाराचे तारतम्य
प्रलोभनांचा मोहच नाहीय
अस्वस्थ बेचैन...हृदयाप्रमाणेच हा...केशपाश...
मुक्त विखरून स्कंधावर... मस्त बेहोश...
बसलोय आम्ही उदासीत डुंबून आकंठ
सुखांना स्पष्ट नकार देत
समजत असावेत ते कदाचित अजाण आम्हास
परिणामांविषयी अनभिज्ञ...
हे ईश्वरा...! आम्हास त्यांचा प्रत्येक आरोप
कबूल आहेय.

सुनसान किनारोंपर एक शहर हमारा है
हमने भी जवानी को इस तरह गुजारा है

तूफाने...समंदर को पलकों मे छुपाये हुये
अक्सर ही तन्हाई मे मौजों ने पुकारा है

हर बार हमे रुसवा साजों ने किया लेकिन
चाहत के विरानों को नग्मों ने सँवारा है

महबूब के पहलू मे रोये भी तो बेआवाज
उस रात की हसरत मे हर जख्म कँवारा है

शानों पे बखेरे हुये इन जुल्फे परिशाँ को
डुबे है उदासी मे खुशियों को नकारा है

शायद वो समझते हो अंजाम से नावाकिफ
हमको तो खुदाया हर इल्जाम गँवारा है

संध्या ही...
आयुष्याचा शेवटचा प्रहर...
चितेची चैतन्यहीन राख केवळ
जीवनाच्या या संपूर्ण प्रवासात
दुःखाचीच ओळख फक्त
जिवंत, मनाच्या जाणिवेत !
मिसळलेय यातनांचे रसायन
शिरांमधून वाहणाऱ्या रक्तातून,
प्रत्येक आनंदक्षणही जणू यातनांचंच देणं,
सुदूर अनंतापर्यंत जातेय ही वाट
बिनचूक नोंद झालीय या वाटेवर
आयुष्यातील प्रत्येक गोष्टीची
जो पोळला घन शीतल छायेत देखील
आणि थकला अर्ध्यातच प्रवासात
तो स्वतःच बहरतोय वसंत होऊन आता
असेच अव्याहत फिरत असते कालचक्र
सुटत नसते कोणीही या कालक्रमातून
या कालगतीचा आणि नियतीचाही
नियमच विलक्षण...!
आकंठ तृप्तीच्या क्षणीच परत
नवीन तृष्णा उभी असते दारात तृप्तीच्या.

शाम यह अंतिम चिता की राख है
दर्द की पहचान मन के साथ है

गम घुला है रगों मे इस कदर
हर खुशी अब दर्द की सौगात है

राह यह जो दूर तक है चल पडी
लिखी इसपर उम्र की हर बात है

छाँह मे झुलसा थका जो राह मे
अब स्वयं वह बन गया मधुमास है

काल के क्रम से नही कोई बचा
द्वार तृप्ती के खडी फिर प्यास है

/

आमची तब्येतच अशी, विरक्त निर्मोही
अन्यथा...जगण्यासाठी
सारेच भौतिक बहाणे आहेत उपलब्ध
कणांकणांतून... पानांपानांतून
शरीर आणि प्राण बद्ध करणाऱ्या
शृंखलांचा होतोय आभास
कुठे असावे ते स्थान ! तो प्रांत !
जिथे चिरविव्हल प्राणांना
लाभेल प्रश्रय प्रशांत...
सतत खेळत असतात मनाशी...
निःश्वासाची गीतं
आत्म्याचा स्वभावच मुळात, प्रीतीशील असावा...!
जगरहाटीत असल्या स्वभावाचे काय ?
इथे तर, ओठांवर नित्य स्मित...
आणि...
दृष्टीत उसना मैत्रीभाव
घेऊनच जगायचे असते हसत... आयुष्यभर,
आणि अशात..., प्रत्येकच श्वास कसा
परका वाटत असतो
जणू काही... परक्या अनोळखी शहरात
आवागमन असावे आपले.

अपनी तबीयत ही फकीराना है
वैसे जीने को हर बहाना है

पत्ते पत्ते पे है कफस का गुमाँ
कौन सी शाख आशियाना है

दिलसे उलझे है आहों की गजल
मिजाजे रुह बहुत आशिकाना है

हंसी लबों पे निगाहों ये खुलूस
यूँही ता-जिंदगी मुस्कुराना है

लगे हर साँस पराई सी, जैसे
अनजान शहर मे आनाजाना है

निर्जन एकांतात...
जळत असावी ज्योत
जशी मंद, मंथर शांत
काय जळतेय ! प्राणात हे ! तसेच अगदी !
कुठला पदार्थ विरघळतोय...
या दीपशिखेच्या आंचेने अंतरात !
मार्गही निश्चित नाहीय माझा,
पथप्रदर्शकही नाहीच कोणी...!
हे ईश्वरा...!
माझं जीवन, साऱ्या प्रवाहातून वेगळं वेगळं
एकाकी कसं चाललंय...कुठे...?
कोण साद घालतंय सतत मला
दूरच्या अज्ञात किनाऱ्यांवरून
कुठल्या दिव्य प्रकाशाच्या संदेश लहरीवर
आंदोळतोय प्रत्येक श्वास, न श्वास, माझा,
निरंतर जळावे आम्ही असेच,
अशीच जर असेल ईच्छा त्या निर्माणकर्त्याची, तर...
आमचे सामर्थ्य जाणून
दुःखाचे दान देणाऱ्या
हे सन्मानकर्त्या
हे गीतच तुझ्या नांवे...

सुनसान मे तनहा शम्मा हो जैसे जल रही
क्या जिगर मे जल रहा ये कौन शै पिघल रही

कोई नही है रहगुजर रहबर नही कोई
या रब् ये जिंदगी मेरी अलग अलग चल रही

दे रहा सदायें कौन साहिलों से दूर के
पैगामे रोशनी पे हर साँस है मचल रही

हम इस कदर जलें सदा गरचें हैं उसकी आरजू
ऐ कद्रदाँ मेरे, मेरी, तेरे नाम, ये गजल रही

कधी होईल जीवनाची संध्याकाळ
अन, केव्हा पडेल गांठ
मृत्यूशी…
काहीच माहीत नाहीय
कुठल्या वाटांनी जाऊ
माहीत नाहीच…
निघालो आहोत पण…
तो सहप्रवासीही सोबत नाहीच
प्रत्येक अश्रू जणू…
दुःख अन व्यथेची एक कथाच आहे
कोणाचे नाव असेल ओठांवर
तेही माहीत नाही
सारीकडेच काळोखात
एक उन्मादोत्सव आहे
अन् पुढ्यात पसरलीय
प्रदीर्घ काळोखी रात्र
आता पहाट नाहीच
थांबलोही कधी काळी कुठे क्षणभर
तरी अंतरात
विचार असायचा एकच
ज्याचा शोध घेतोय
ते हे शहर नव्हेच

कब जिंदगी की शाम हो कुछ खबर नही
कब मौतका सलाम हो कुछ खबर नही

किस राह जायेंगे कुछ भी नही पता
चल पडे है लेकिन वो हम सफर नही

हर आँसु इक फसाना दर्दोगम का ह
हो लब पे किसका नाम कुछ खबर नहीं

हर ओर अंधेरों मे इक जश्ने जुनूं है
पहलु मे स्याह रात है अब सहर नही

जब भी रुके कहीं तो बस् ये खयाल था
हमे है, तलाश जिसकी यह शहर नही

कुठून येणे...
अन् कुठे जाणे...?
अद्भुत वैचित्र्यपूर्ण कथा आहेय
हे जीवन
किती अपुरे आहे आयुष्य...!
किती प्रदीर्घ आहे आयुष्य...!
रे नावाड्या
मध्यधारेत असणारी नौका
लावशील किनाऱ्याला
सगळा भार तुझ्यावरच...!
कळत नाही...
कुठल्या दिशेनं वाहतेय
दुनियेची हवा
श्वास घेण्यासाठीही
लागतात वहाणे
मनाचा ऋतू
नित्यच सुगंधाने दरवळत असतो
प्राणांची स्थिती कायमची मस्त मदहोश
अशा गहन वेळी
हे कोण विसरलेल्या गोष्टी
बोलतंय हळुवार
जुने दुःख मनात जागू लागतेय.

कहाँ से आना कहाँ है जानां
हैं जिंदगी ये अजब फसानां

ये उम्र छोटी ये उम्र लंबी
ओ, रे माँझी पार लगाना

हवा जहाँ की किधर रवाँ है
साँस भरन को लगे बहाना

हंसी लबों पे निगाह नमसी
आह भरो तो हसे जमाना

दिल का मौसम महका महका
रूह का आलम खूब दिवाना

कौन करे है भूली बाते
ले अंगडाई दर्द पुराना

भिजलो एकमेकांच्या संगतीत
तृषार्त त्या क्षणांची ती रात्र
कालची ती वर्षेची रात्र
आकाशात गडद मेघ होते
तरीही ती होती चंद्राची रात्र
अकल्पितपणे
हलकेच नववधूसारखी
लज्जेचा पडदा सारून
जणू आली होती ती रात्र,
त्या रात्री..
रिकामे पात्र कोण भरून गेले
उपहारांचीच होती ती रात्र
आम्ही केव्हा अपेक्षिली तुझ्याकडून
अपार व्यथांची ती रात्र
मेघही होते अन् आग देखील...
घेऊन बुडालीच ती रात्र
भावनांच्या भोवऱ्यात...!
पूर्ण निष्ठेचीच कदाचित...
असावी ती रात्र
अन् तीच एक फक्त
असावी पुण्य संपादनाची रात्र

प्यासे उन लमहात की रात
कल की वो बरसात की रात

आसमान पे बादल गहरा
फिर भी थी वो चाँदकी रात

चिलमन से उठकर थी आई
दुल्हन सी जज्बात की रात

खाली दामन कौन भर गया
वो थी इक सौगात की रात

चाही थी कब हमने तुझसे
दिलके सौ सदमात की रात

अब्र भी था और आग भी थी
ले डूबी गिर्दाब की रात

अहले वफा की थी वो शायद
एक वही थी सवाब की रात

खूप तृषित आहेत ओठ
आणि
पेलाही हातीय,
कोणाला दोष देणार याचा...
संधिकालापूर्वीच
ढळून गेलीय सांज
यात दोष काय आमचा...पण
बदनाम मात्र आम्हीच झालोत
अकारण...
सारे आयुष्यच तृषार्त
प्राण ही तृषितच
आणि कित्येक अनाम दुःखे आहेतच
ज्यांची संगतीच लागत नाही
थांबून पाहिले प्रत्येकच मुकामावर...
त्याच घटना, त्याच आपत्ती
रात्रंदिवस.
आमचे भानच कदाचित हरवले असावे
या बेहोशीत,
केव्हा ते नाव ओठांवर आले
कळलेच नाही

लव हे प्यासे हाथ मे जाम
किस पर क्या देते इल्जाम

शाम से पहले ढल गई शाम
मुफ्त हुये हम ही बदनाम

जीवन प्यासा रूह भी प्यासी
और कई है गम गुमनाम

हर इक गाम पे रुककर देखा
वो ही हादसे सुबहो शाम

हमको शायद होश नही है
कब आया लवपर वो नाम

हाक दिलीय... अनोळखी रस्त्यांनी
न जाणे...! कुणीकडे...?
घुमू लागलीय साद दऱ्याखोऱ्यातून
माझ्या धृष्ट इच्छांनो ! अशा उन्मत्त होऊन
कोलाहल माजवू नका
मोठ्या निग्रहाने सांभाळलेय
या दुःखी मनास मी
स्वरांपासून वंचित नाहीच माझे मौनही...
स्वयंभू स्वर आहे या मौनास
न जाणे कुठे ओढून नेतेय...
या मौन निनादाची लाट मला
आता माझ्या भूतकाळातून...
कोणी मला हाक देऊ नये
या प्रवासी पावलांना किती काळानंतर
ही निश्चित अशी वाट सापडलीय
परिणामांना भिणे...
एक काल्पनिक भयगंड आहे केवळ
अशक्य नाहीच काही...!
पूर्वी कधीतरी
'फरहाद'ने पर्वत खोदून
वाहवला होताच दुधाचा प्रवाह
दृढनिश्चयाने...प्रियप्राप्तिसाठी

अजनबी राहों ने पुकारा है जाने किधर
सदायें गूँज रही वादियों मे जाने किधर

मेरी गुस्ताख तमन्नाओं मत शोर मचाओ
बडी मुष्किलसे संभाला है मैने सोजे जिगर

मेरी खामोशियाँ आवाजसे महरुम नही
जाने खेंचे लिये जाती है कहां ये लहर

अब न मुझको माजी से मेरे पुकारे कोई
मुद्दतों बाद मिली कदमों को ये राहे गुजर

अंजाम से डरना तो बस इक खौफ है 'सूफी'
कभी फरहाद ने लाई थी यहां शीरे-नहर

तुझ्याशिवाय
सृष्टीची उल्हासमय बाग देखील
जाणवतेय् वाळवंटासमान
झालेय सारे शहरच जणू उजाड माझ्या दृष्टीने !
हे वृक्ष...! ही रोपं...! हा नील आसमंत
परतणाऱ्या सूर्याच्या स्वर्णरश्मिनी...
सिन्दुरी आभेत न्हाऊन निघालेली संध्या,
काहीही मोहवीत नाही मनास
नाहीच काही या नजरेत तुझ्याविना...
तूच तू फक्त,
तुझीच...चाहूल वातावरणात...
तुझ्याच प्रीतीप्रलापांचे गुंजन हवेत,
मलूल झाल्यात तुझ्या आठवणीत
आकांक्षांच्या कोमल कुँवार कलिका,
गातेय निःश्वासांचे गीत
अंतर्बाह्य अश्रूंनी चिंब झालेली रात्र
दुःखात चूर जाणवतेय
चंद्राचं सुखद शीतल चांदणं देखील
तुझ्याशिवाय आजकाल
ज्या रस्त्यांवरून अनेकदा सोबत चाललो आपण
त्या रस्त्यांवरची धूळ...
आणि जिथे क्षणभर विसावलो
ती सारीच ठिकाणं, फुलं, पानं,
विचारतात मला हे सारेच तुझ्याविषयी
आणि विचारतात माझ्या एकाकीपणाबद्दल

गुल्शन भी है सहरा मेरी नज़रों मे याराँ आजकल
वीराँ है ये सारा शहर जो तू नही तो आजकल

ये पेड पौंधे, ये आसमाँ, साँझ सिन्दुर मे रची
कुछ भी नही निगाहोंमे तेरे सिवाय आजकल

तेरी आहटें फजाँ मे है हवा मे सरगोशियाँ
मुरझा गई है चाह मे कलियाँ चमन की आजकल

ये रात आँसुओं मे तर गा रही है आहें गजल
गमगीं है चाँदनी सुहानी बिन तेरे ये आजकल

ये रास्तों की धूल और उन राहों के मकाम भी
मुझसे है पूछते सभी तनहा से क्यूँ हो आजकल

नाव बुडू लागलीय...बुडून जाऊ दे
मध्यधारात येत असेल मृत्यू
तर येऊन जाऊ दे
येईल निश्चितच वसंताची बहार कधीतरी
पायातील पैजणांची चाहूल देत,
आता हसतोय उपहासाने...
हा पानगळीचा उध्वस्त मोसम...! हसून घेऊ दे...!
चमचमत्या तारकांची...
ही काळी अंधारी रात्र...
नववधूसारखी शृंगारेल कधीतरी निश्चितच
खंत नको ...!
नयनांच्या आकाशातून
तुटणाऱ्या तारांना तुटून जाऊ दे,
होऊन जाऊ दे, पापण्यांचा भार हलका,
पाषाणाचे हृदय देखील पाझरेल
एक दिवस निश्चितच. आज मात्र...!
पाषाणांचा वर्षाव करणाऱ्यांना
मनोरंजन करून घेऊ दे...
हाय...! आज झालेय तरी काय आम्हास
कशी बरसण्यासाठी आतूर झालीय स्थिती आमची
सैरभैर होऊन असे पाझरून कसे चालावे
या बहकणाऱ्या मस्त तब्येतीला...
जरा सावरून घेऊ दे...

डूब जाये जो सफीना तो डूब जाने दो
अब मंजधार मे आये जो मौत आने दो

कभी बहार के पाँवो मे बजेगी पायल
अभी मुस्काए खिजायें तो मुस्कुराने दो

सियाह रात, सितारों की, बनेगी दुल्हन
पलक से आज सितारों को टूट जाने दो

कभी तो पिघलेगा सीना-ए-संग यकीनन
संग बरसाए, उनको भी, बहल जाने दो

'सूफी, यूं हाल हमारा है, वरस जाने को
आज तबीयत को जरा तो संभल जाने दो

चित्त कसे अस्वस्थ अर्धसुप्त अचेतन झालेय
जराही चैन पडत नाहीय
कोणतीही गोष्ट जीव रमवण्यात
सफल सिद्ध होत नाहीय, करावे तरी काय...
मैफल उठून गेलीय...मौन झालीय...
निरंतर जळत असलेली मनाची ज्योतही विझून गेलीय
एकही काव्य कल्पना...स्फुरत नाहीय
ओठांवर लहरत नाहीत गीतांच्या लहरी
कुठल्या अनाम बेहोशीत चाललाय...जीवनाचा हा प्रवास...
दुसरा मार्गही नाही, पर्याय नाहीच
दुसरा मार्ग...वेगळा प्रवास
आता होऊच शकत नाही आमचा
दुनियेत काय होत नाही
रोजच...दुःख आणि जखमांच्या विषयी
बोलले जात असते
पण...पहा ना ! जगाचा उथळपणा
साधा उल्लेखही होत नाहीय जखम चिघळण्याचा,
सारेच इथे दुःखाने बेजार...
श्वास गुदमरतोय कित्येकांचा, तरीही...
दुःखांवर प्राणांतिक प्रेम करणारा
आता दिसत नाहीच कोणी
बुडणारच होतो आम्ही नावेसहित मध्यधारात,...
त्या मेहरबान नावाड्याने, जर
आणले नसते काठांवर

बेखुदी है इस कदर करार कुछ आता नही
कोई शुगल आजकल जी को बहलाता नही

महफिलें खामोश है बुझ गई शमाए-दिल
शेर-ओ-नग्मा कोई लब् पे लहराता नही

चल रहा है सफर न जाने किस सुरूर मे
सफर कोई भी हमे रास अब आता नही

यूं तो हरेक जख्म का चर्चा भी है मगर कहीं
नासूर के हालात का जिक्र तक आता नही

डूब ही जाते थे मय किश्ती के मंजधार मे
नाखुदा गर हमे साहिल पे वो लाता नही

गम के मारे सब यहां चाकदिल है चाकदम
आशिके जाने गम वो अब नजर आता नही

तीच आग आहे अनादि...
चंद्राच्या शीतल चांदण्यात
तीच आग आहे माझ्या अभंग मौनात
संध्येचा एकांत हृदयातील गुपितांशी...
सलगी करू लागला...आणि...
हृदयरहस्यात सामील झाला...
तेव्हापासून, रंगभरा फाल्गुन
कायम वसलाय माझ्या श्वासांत
शरीराच्या दीपाधारात...प्राणांची अखंड ज्योत घेऊन जळणाऱ्या
या दीपांना विचारावे तर कोणी...!
हृदयावरील जखमेचा प्रत्येक व्रण
दीपशिखेच्या स्वर्णज्वालेवर कस लावून घतलाय
गीतांचा जन्मच मुळी फुलांच्या निःश्वासातून
या निःश्वासांनीच छेडलेत तराण
पण...कोणाला तमा फुलांच्या निःश्वासाची
स्वतः माळ्यानेच पायदळी तुडवावी
अशी ही बाग आहे
हीच इथली नीती अन् नियती
इथे प्रत्येक हृदयात...
स्वतःच्याच स्वयंभू ज्वालेत जळणारा सूर्य आहे
आणि चंद्राचे हृदय देखील कलंकहीन नाहीच
तशीच ही मने दुःखव्रणांनी युक्त
बर्फाप्रमाणे थंड चैतन्यहीन निःश्वासांनाही
प्रवाहमान करू शकेल असा जीवनराग,
अशी जीवनशक्ती माझ्या गीतात आहे...
तीच आग आहे अनादि माझ्या मौनात...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३३
नों. क्र. २०६४०
काव्य क २१५५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

चाँदकी चाँदनी मे वही आग हैं
मेरी खामोशियों मे वही आग है

शामे तनहाई जबसे हुई राजदाँ
मेरी साँसो मे रंगोभरा फाग है

इन जलते चरागों से पूछो जरा
लौ पे सेंका हुआ हर इक दाग है

गुल की आहों ने छेडे तराने मगर
रौंदे माली जिसे ये वही बाग हैं

हर सीने मे सूरज सुलगता हुआ
और न माहेजिगर ही बेदाग हैं

वर्फ सी सर्द आहों को कर दें रवाँ
मेरे नगमों मे जीवन का वो राग हैं

आतापर्यंत दृष्टीत असलेली... मोहक दृष्ये
बदलून गेलीत सारीच अचानक
जखमा हिरव्या ओल्याच अजून
शस्त्रे मात्र बदललीत निर्मोही घाव करणारी...
अभिमान होता त्यांना आम्हाविषयी...
ते दिवसच होते वेगळे
आता तर...त्या सगर्व दृष्टीक्षेपांची तीव्रताही सरलीय
ऐकून होतो...ऋतूंचा
विश्वासच नसल्याचे आमच्यावर
आम्ही होतो, तसेच आहोत अजूनही
ऋतूच बदलून गेलेत ते
लिहून रक्तरंगाने जे संदेश दिले होते प्रियाला
त्या शब्दांचे चेहरे अजूनही तेच पुरातन
अर्थ मात्र बदलून गेलेत
त्या मीलन काळातील...
मधुर...मादक...दुःखदायक प्रत्येक आठवण
थाप देत असते, हृदयाच्या बंद दारावर
कसे सांगावे त्यांना, ते नसतात इथे...
हे घरच बदलून गेलेत
वाटते...पहावी एकदा तरी
प्रियाच्या प्रिय मुखावरील अपूर्व शोभा...
पण सामना होताच त्यांच्याशी
तो निश्चयच बदलला

अबतक निगाह् मे थे, वो मंजर बदल गये
जख्म है हरे अभी, और खंजर बदल गये

उन्हे था नाज हमपे, वो दिन थे और ही
अब तो निगाहे नाज के नश्तर बदल गये

हमपे, सुना, नही था, मौसम को एतबार
हम है वही, जो थे, मगर मौसम बदल गये

रंगे-खूँ से हमने जो, पयाम थे दिये
लफ्जों की शक्ल है वही, मानी बदल गये

यादे-विसाल आके हर, दस्तक दिया करे
आजकल नही यहां, वो मकाँ बदल गये

चाहा था देखना उनका रुखे-जमाल
वो रुबरू हुये जब इरादे बदल गये

मन लागत नाहीच कुठे...! आताशा...
फुलांच्या आणि कोकिळेच्या गीतात नाही
प्रेम आणि अश्रूंच्या कथेतही नाही
ऐन बहारात आणि वसंतात देखील रमत नाहीच
मंदिरात मूर्तिपूजेतही नाही
आणि प्रिय सहवासाच्या मधुर
कल्पनेतही नाही
हाय...! करावे तरी काय...
गर्दीतही नाही
आणि विजनातही लागत नाहीच मन
जिथे सुखाचा उत्साहपूर्ण कोलाहल आहे
अशा घरातही मन लागत नाहीच
लावावे तरी कुठे...
असले हे वैरागी...विरक्त मन...
हे ईश्वरा...!
सांग तू तरी...!
तुझ्या दुनियेतील मायावी मृगमरिचिकेत
लागत नाहीच मन अजिबात

नग्मा–ओ–गुल के तरानों मे जी नही लगता
अश्क–ओ–इश्क के फसानों मे जी नही लगता

जी नही लगता बहारों मे सनमखानों मे
हाय, बज्मों मे, विरानों मे जी नही लगता

शोरो–गुल दौरे खुशी जहां हो खूब जवाँ
ऐसे आबाद मकानों मे जी नही लगता

जी लगाये तो हम किस हाल लगाये या रब
तिरी दुनिया के सुराबों मे जी नही लगता

प्राणातून उठणाऱ्या...
धुराला द्यावा कोणी एक थेंब, फक्त अश्रूचा...
आसमंत व्यापून भरतेय डोळयांत
आयुष्यवाटेवर उठणारी दुःखांची धूळ
सांत्वनासाठी मागतेय...ती एक थेंब फक्त, पापण्यांतील...
जळू लागलाय श्वास न श्वास...
प्राणातील दीपशिखेच्या आडोशाला,
हृदयातील तप्त अंगार मागताहेत एक थेंब पापण्यांतील...
कंटाळलो आहोत आम्ही...
सुखाच्या जीवघेण्या विभ्रमांनी
मनातील अनंत असाध्य रोगांना गरज आहे...
पापण्यांतील एका उष्ण थेंबाची
मोठेच विचित्र आणि विलक्षण या दुनियेतील रिवाज
आम्ही बेजार यांनी अपेक्षा करतोय एका थेंबाची
अंतरातील दुःखवैभवासाठी...
पुनःपुन्हा माझा धन्यवाद त्यांना सांगावा
त्यांचे शुभचिंतक आम्ही मागतोय एक थेंब पापण्यांतील
सोपे नाहीच तसे, चुकवणे अश्रूंचे कर्ज...!
पण करावे तरी काय...!
या विकल विव्हळ जिवाची तगमग
शमेल ती अश्रूंच्या थेंबानेच
प्राणांशी सलगीने कुजबुजणारा आहेय, 'सूफी'
माझा हा निःशब्द एकांत...
पण...माझी ही गीतंसुद्धा मागतात पापण्यांतील एक थेंब...

दे दर्द के धुएँ को पलकों से एक बूँद
गुबार मांगते है पलकों से एक बूँद

हर साँस जल रही है शम्मा की लौ तले
अंगार मांगते है पलकों से एक बूँद

तंग आगये खुशी की नाजो अदासे हम
आजार मांगते हैं पलकों से एक बूँद

दस्तूर जमाने के बडे बेहुदा लगे
बेजार मांगते है पलकोंसे एक बूँद

उनसे हजार बार मेरा शुक्रिया कहें
गमख्वार मांगते है पलकोंसे एक बूँद

इस कर्जका चुकाना आसान तो नही
बेकरार मांगते है पलकोंसे एक बूँद

तन्हाईयाँ मिरी सरगोश है 'सूफी'
नगमात मांगते है पलकोंसे एक बूँद

माशीसारख्या अनंत जीवट...
आमिषांच्या जाळ्यात फसलेयत
समृद्धीच्या गालिच्यात गळ्यापर्यंत धसलेयत
भरगच्च शरीरावर
उठले आहेत फोड...आणि
नखक्षतांच्या व्रणांनी ग्रासलेय संपूर्ण
कत्तल करावयास चालले होते आमची
स्वतःच अडकलेयत...
स्वतःच पसरलेल्या जाळ्यात
उत्तुंग ईमारती पाहून...
बेहोश होत होते ते हर्षाने
आता जिथे तिथे उद्‌ध्वस्त अवशेष देखील
मनःपूत सजलेयत,
गर्व आहे आम्हास
जिवंत राहिल्यात भाकरी तरी
अन्यथा
आता तिथे, भुकेचीच नगरं वसली आहेत
पहावे (आंधळ्यांनी)
प्रकाश घेऊन उधार...
आवळलीत किती
बाहूंची बंधनं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मक्खियों के जालमे फँस गए है
कीमती कालिनों मे धँस गए हैं

गुदगुदे जिस्मपर छाले पडे हुए
नाखुनों के निशाँ भी ग्रस गए हैं

कत्ल करने को चले थे आपको
खुद शिकंजो मे अपने फँस गए है

खुश हो रहे थे देखकर ईमारते
जी खोल खंडहर भी सज गए हैं

फख्र है कि रोटियाँ जिंदा बची
भूख के अब नगर भी बस गए हैं

देखिए भी रोशनी लेकर उधार
बाजुओं मे बंद कितने कस गए है

तल्खियाँ, मस्तियाँ, हुस्न, मौजूद है
तमन्नाओं के याँ जश्न मौजूद हैं

शीशा है, शहर है, औ इन्सान हैं
सभी साजोसामान मौजूद हैं

फूल लाये चढाने वो कब्रपर
हर तरफ एक शमशान मौजूद हैं

जनाजों पे डाले कफन आपने
फिर कफन का फरमान मौजूद है

बसाने है वाँ गर शहर आपको
गुलिस्ताँ मे बियाबान मौजूद है

आओ भूलें कलकी हर बात को
भूलने का अरमान मौजूद हैं

टूटे हाथों बनाएँ हम आशियाँ
हम मे खंडर वीरान मौजूद है

कटुता आहे...
उन्माद आहे...
सौंदर्य आहे...
आणि आहे उत्सव आकांक्षांचा इथेच...सारेच आहे...
आरसा आहे...! प्रतिबिंब दाखविणारा

शहरही आहे...
माणसेही आहेत शहरात
आहेत उपस्थित सर्वच साधनं

फुलं आणलीत त्यांनी
वाहण्यासाठी समाधीवर
पण इथे तर, प्रत्येक दिशेला एक स्मशान आहे
तुम्ही टाकलेत कफन प्रेतावर
काय झाले एवढ्याने
परत...परत कफन टाकण्याची राजाज्ञा आहेच

वसवायची आहेत शहरं,
तिथे आपणास...पण
या दुनियेच्या बहरलेल्या बागेत देखील
अनंत, उजाड, आहेत
खरेच...! विसरून जाऊ या...
कालची प्रत्येक गोष्ट
विसरण्याची इच्छाही मनात आहेच

आपण दुर्बल हातानीच करू... आश्चर्याची निर्मिती...
खरे तर... आम्हा प्रत्येकातच
एक उजाड, विराण आहेच कायम

तल्खियाँ, मस्तियाँ, हुस्न, मौजूद है
तमन्नाओं के याँ जश्न मौजूद हैं

शीशा है, शहर है, औ इन्सान हैं
सभी साजोसामान मौजूद हैं

फूल लाये चढाने वो कब्रपर
हर तरफ एक शमशान मौजूद हैं

जनाजों पे डाले कफन आपने
फिर कफन का फरमान मौजूद है

बसाने है वाँ गर शहर आपको
गुलिस्ताँ मे बियाबान मौजूद है

आओ भूलें कलकी हर बात को
भूलने का अरमान मौजूद हैं

टूटे हाथों बनाएँ हम आशियाँ
हम मे खंडर वीरान मौजूद है

कुठे आम्ही...! अल्हड अमर्याद
मदमस्त सागर लाटांसारखे
अन् कुठे तुमचे असणे
विवश किनाऱ्यांसारखे
कशी वसवणार अशाने
धीट उन्मत्त आनंद ऋतूंनी जीवनाची बाग
त्याचीच होऊ शकेल,
मस्तीची मदभरी दुनिया
ज्याच्यात असेल ताकद
जळत्या निखाऱ्यांशी खेळण्याची
कृपा ही तुझीच शेवटी...!
दुःखाचा तीव्र सल
कमी केला तो या कवितांनीच
प्रलयच झाला असता...! 'सूफी'
हिरवे बागबगीचे ही
जर का असते
उद्ध्वस्त उजाडांसारखे

कहां हम मतवाली मौजोंसे
कहां तुम मजबूर किनारोंसे

आवाद करोगे क्या आखिर
गुलशन बेबाक बहारों से

मस्ती का जहाँ होगा उसका
जो खेल सके अंगारों से

आखिर ये इनायत है तेरी
गम बहला किये अशआरोंसे...

हो जाती कयामत तब 'सूफी'
गुलजार भी होते दयारों से

निःशब्द साद...! हृदयाच्या मौनातून उठणारी
हाक दिलीय तुला तिने कितीदा
डोळ्यांच्या गहनातील मेघछायेनं देखील
हाक घातलीय तुला कितीदा तरी
अनावर आठवण तुझी पदर धरून चालू लागली हृदयाचा
तेव्हाही अस्तमान दिवसाच्या परतणाऱ्या
किरणांनीही, हाक दिलीय तुलाच,
सांज ढळताच सखया...! प्रज्वलित झालेत श्वासांचे दीप
या प्रकाशउत्सवाच्या विझू आलेल्या
प्रत्येक मरणासन्न दीपशिखेने साद घातलीय तुला...
राजसा...! विरहाच्या विकल रात्रीत
नीज यावी तरी कशी...
रात्रीच्या एकांतात माझ्या सोबत जागलेल्या
तारकांनीही हाक दिलीय तुला अनावर...!
घनघोर रात्र संपून विरहाची
छेडू लागला जेव्हा पहाटेचा सुगंधी समीर
त्या गंधयुक्त समीर लाटेवर विहरणाऱ्या
केशकलापातील, प्रत्येक कुरळ्या कुंतलाने,
साद घातलीय तुला...त्या सुगंधी वायूवर विहरत.
तुझ्या विषयीची निष्ठा...
आणि दुनियेतील दुःखेही सोडून जाण्याचा
निर्णय घेऊन निघालो आम्ही...त्याक्षणी...
नेहमीच तुझ्यासोबत चाललेल्या
रस्त्यांवरील धीट चंचल दृष्यांनीही साद घातली तुला

दिलकी खामोश सदाओं ने पुकारा
तुझको प्यासी इन घटाओंने पुकारा

जब तेरी याद चली थामके दामन
डूबते दिन की शुआओं ने पुकारा

दीयें साँसो के जले शाम ढले से
जश्ने–रौशन की फना लौ ने पुकारा

शबे–हिज्राँ मे हमे नींद क्या आती
साथ जागे इन सितारोंने पुकारा

जब भी छेडे है हमे बादे सबां ये
जुल्फ के हर पेंच ने लहराके पुकारा

छोड चले थे जहाँने–गम– ओ वफाको
राह के इन शोख नजारोंने पुकारा

कोणी उजळलेत ! आकांक्षांचे दीप प्राणांत...!
डोळ्यांतील गहिऱ्या बदलीत
तरळू लागलीत किरणं...
कोण ? कुठे ? न जाणे...जाळतोय जीव
कुठल्या सुदूरच्या प्रांतातून...दऱ्या-डोंगरातून
उठू लागलाय धूर...
इथे सारेच विलक्षण...
कुठे पूर्ण प्रकाशमान चंद्र, तर कुठे
गहन अंधारी आमावस्येची रात्र
आमच्या शोधाची ज्योतच न विझून जावी या प्रवासात,...
फुलांच्या मोसमांनो बहारांनो...
देऊ नकाच आम्हाला तुम्ही आनंदाचे हास्य
निर्भर नाहीच मुळी आम्ही तुमच्यावर
आमच्यामुळेच खरे तर
ही सृष्टी आणि हे वातावरण
चिरतरुण आहेय, चेतन आहेय
कळत नाही कोण तो रसज्ञ...!
कोणी मिसळलीय हृदयाच्या रक्तांत
मदिरेची मादकता आणि अध्यात्माची अनासक्ती
एकाच वेळी...

दिये आरज़ूके ये किसने जलाये
गहरी घटाओं मे किरन झिलमिलाये

कहाँ कौन जाने जलाये जिगर है
किन वादियों से धुआँ उठ रहा ये

कही चाँद रोशन कहीं स्याह रातें
कहीं जुस्तजू की शमा बुझ न जाये

बहारों हमे तुम न बख्शो तबस्सुम
हमीं से जवाँ है चमन की फजाँ ये

जिगर के लहू मे किसने है घोली
शराबों की शान शेख की अदा ये

एवढीशीच तर गोष्ट...
समजून घेतीलही ते कदाचित
आपले ओठही विलग करणार नाही आम्ही
राहील या ओठांवर मौनाची मोहोर नेहमीच
आणि नजरदेखील वर करणार नाही कधी
त्यांचे समक्ष
पाहून त्यांना अन्य कोणासमोर
जळू लागेल शरीर, आणि प्राण, तेव्हा फक्त
आपल्या विवशतेवर तळमळत राहू तसेच
कधी एखादे फूल जरी मिळाले त्यांच्या बागेतील
तर...एकेक पाकळी न पाकळी...
हळुवारपणे तप्त पापण्यांवर सजवून घेऊ,
पडेल त्यांच्या दृष्टीस कधीतरी ही अवस्था,
या अपेक्षेतच झुरून झुरून कदाचित...
उदास आणि निराश हे जग सोडून जावे लागेल आम्हास
झालाच कधी सामना त्यांच्याशी तर,
सांगणार नाहीच हृदयातील दु:खाचे रहस्य,
विरहाच्या आगीत त्यापेक्षा,...
हे दु:खपूर्ण आयुष्यच जाळून टाकू.

इक जरासी वात है शायद समझ वो पायेंगे
जुबाँ पे चुप की मुहर नजर न हम उठायेंगे

किसी के देख रुबरू जलेगी जाँ ओ बदन
बेवसी पे हम मगर तडप के रह जायेंगे

वागबाँ से उनके इक फूल भी मिले कभी
हरेक पँखुरी को हम पलक पलक सजायेंगे

निगाहे करम के वास्ते उनकी यूँ तरस तरस
निरास और उदास हम इस जहाँ से जायेंगे

सामना जो हो कभी कहेंगे हम न राजेदिल
सूफी, वियोग आगमे हयाते गम जलायेंगे

छळू लागलीय तुझी आठवण
प्रिया...! अनावर
रडवू लागलाय विरह तुझा असह्य
तू भेटलास...!
आणि, जीवनाच्या आसक्तीची
विझू आलेली ज्योत
पुन्हा, नव्या तेजाने झालीय प्रज्वलित
हा एकांत, सख्या ! तुझ्याशिवायचा
जाळू लागलाय आता
कुठल्या कळत नाही
सुदूरच्या गहन प्रांतातून जळणारी
अन् प्राणांस जाळणारी
येऊ लागलीय साद
जीवनाचा...
हा नीरस एकांतिक प्रवास करीत असता
न जाणे कसे...!
रस्त्यांना मुक्कामाचेच
होत आहे विस्मरण
आता तरी...
जरा शुद्धीत ये
अन्यथा...
मनोव्यथांची ही वेगवान हवा
जाणिवांनाच झोपवू लागलीय

बहुत याद तेरी सताने लगी है
कि अब ये जुदाई रुलाने लगी है

फिर जी उठी है शमा बुझते बुझते
कि अब ये तन्हाई जलाने लगी है

कौनसी न जाने घनी वादियों से
सदा सोजसे तर बुलाने लगी है

सूना सफर ये तै करते करते
मंजिल को राहें भुलाने लगी है

जरा होश अब तो संभालो ऐ 'सूफी'
हवा तेजतर ये सुलाने लगी है

त्यांच्या येण्याने ऋतुराजाची बहार येते
आणि आणते सोबत
माझ्या बेचैन मनाचे स्वास्थ्य
सुगंधाने दरवळू लागतो परिसर
घर...अंगण...
अभिलाषांच्या, स्वप्नाच्या,
कुँवार मुग्ध कळ्या
उमलू लागतात वेगाने
मनाच्या फांदीवर !
येते...
प्रत्येकच वस्तुमात्रांवर जणू
रूप सौंदर्याची अपूर्व शोभा
पडावे जसे...
हळूच गहिऱ्या बदलीतून
श्रावणाचे पिवळे लख्ख ऊन,
अशावेळी...
जेव्हा मन बेहोष होऊन
आनंदाने
लहरू लागते डोळ्यांत वीज,
तेव्हा...
दुःख बदलीसारखं विरघळू लागतं
रस्त्यातील धूळ देखील
पवित्र होऊन जाईल
या स्वप्नांना साऱ्या
सत्यात तर आणून बघ

वो जो आये तो बहार आ जाये
करार दिलका मेरे साथ ले आये

यूँ महक जाये, आह ! घर आँगन
कलियाँ शाखों ही पे चटख जाये

हर इक शै पे वो शबाब, वो निखार,
धूप सावन की जैसे छा जाये

बर्क आँखो मे जो लहराने लगे
गम घटाओं सा पिघलता जाये

'सूफी', ख्वाँबो को दे दीजे हकीकत
खाक राहों की मुकद्दस हो जाये

आनंदाचे संदेश
ते देत आहेत निरंतर
आणि करीत आहेत
वसंताच्या आगमनाचे स्वागत

न जाणे...
केव्हा काय कृपा होईल भाग्याची
आता आणखी भविष्यात...
आम्ही तर अजूनही
जुन्याच जखमांना शिवीत आहोत

गुन्ह्यांचीच आहे वसाहत ही
निष्ठांची नाहीच...
आणि...आम्हीदेखील
गुन्हेच करीत आहोत केवळ

जे मिळाले जीवनापासून
घोळून ते
अश्रूत...
पीत आहोत हळू...हळू...

नित्यासाठीच कायम असो
आमच्या तब्येतीतील मस्ती धुंद गहिरी
या मस्तीनेच दिलेल्या
गीतांनीच आम्हाला जगवले आहे
आणि आजही
या गीतांच्या आश्रयानेच तर जगत आहोत

पयामे खुशी वो दिये जा रहे है
सिज्दे बहारों को किये जा रहे हैं

अभी क्या खबर हो कैसी इनायत
जख्म हम पुराने सिये जा रहे हैं

वफाकी नही ये गुनाहो की बस्ती
कि हम भी गुनाह किये जा रहे हैं

जीस्त से मिला जो अश्क मे मिलाकर
जहर आहिस्ता से पिये जा रहे हैं

'सूफी' सलामत रहें मस्तियाँ ये
नग्मों के सहारे जिये जा रहे है

कोणी दिलीय...
रात्र रात्र जागण्याची सजा
सापडला जर का तो अपराधी
तर...आम्ही मात्र...
त्याला देणार नाही सजा

डोळ्यांतून नीजच चोरून नेलीय कोणी
आणि...अलगद...
सजवून दिलेत अश्रू पापण्यांत

स्वप्नेच विणीत राहिलो आम्ही
...काटेही वेचत राहिलो
पण...खरेच...!
कोणाचा पदर सजलाय ?
फक्त फुलांनी...आणि तारकांनी

नील आसमंताशी स्पर्धा करणारे
माझे डोळे...
स्वत:च आसमंत झालेत
चंद्राने स्वत:च कैद करून घेतलंय स्वत:ला ज्यात

प्राण ओवाळून टाकू नेहमीसाठीच
आम्ही या सजेवर
जर का मिळत असेल ही सजा...
आयुष्यभरासाठी

रात जागने की दी किसीने सजा
जो मिल जाये मुजरिम न देंगे सजा

नींद आँखो से कोई चुरा ले गया
अश्क पलकों मे किसने दिये हैं सजा

ख्वॉब बुनते रहे खार चुनते रहे
फूल तारों से दामन किस का सजा

यूँ निगाहे मेरी आसमाँ हो गई
खुद जहा चाँद ने कैद की ली सजा

इन सजाओं के सदके सदा हम रहे
उम्रभर के लिये जो मिले ये सजा

तुझ्या डोळ्यांतील निबिड अरण्यात
हरवून न जावे स्वतःला...
म्हणून तुझ्या नजरेला नजर देणेच आम्ही टाळतो
तुझी प्रकाशमान नजर
जणू काही मोहाच्या जादूचे जाळे विणीत असते
तुझेच फक्त चिंतन स्मरण असते
स्वतःचे भानही उरत नाही
जीवनाचा प्रवास आजपर्यंत
एका वाळवंटातून दुसऱ्या वाळवंटातच झालाय
आता मात्र या वाळवंटाचे...
नगरात रूपांतर होऊन हे...
अडकवून न टाको
या मोहमयी मायाजालात,
आमचा प्रवास दरवेळीच
अपेक्षाभंग आणि अपयशातूनच,
हीच जणू नियती;
मुक्तपणे होऊ शकेल प्रवास
अशी ही पायवाटच नाहीय्

तेरी निगाहे दश्त मे खो न जायें हम कहीं
इसी वजह से हम तुझसे मिलाते नजर नही

नजर तेरी नूरानी जाल सा बुनती है
तेरा ही बस खयाल है अपनी खबर नही

सहरा से फिर सहरा मे रखते गये कदम
बन न जाये सहरा शहर उल्झा न दे कहीं

गुजरे है बार बार यूँ नाकामियों से हम
हो सके अपना गुजर ये वो रहगुजर नही

घनदाट केशकलाप विखरून
चेहरा आम्ही झाकून घेत नाही
आणि, दृष्टीसामर्थ्याची परीक्षाही घेत नाही
प्रतिबिंब दर्शन देणारा...
हृदयाचा अथवा डोळयांचा आरसा समोर असला
तरच दर्शन सुलभ होते
अन्यथा...अंतर्बाह्य...
रूपसौंदर्याची बहार दृष्टींस पडणेच अशक्य
स्वतःहून दाखविणे तर दुर्लभच
आपणास झालेय तरी काय आजकाल ?
हा अंधार उजळून टाकणारी दीपशिखा...
का करीत नाही प्रज्वलित
आपण होता जीवनात...
तेव्हा, सारे विश्वच उल्हासमय होते
हाय...! आता चंद्र-तारे देखील हसणं विसरलेत
निष्प्रभ झालेत...!
हृदयांतील नाजुक गोष्टींशी, सुसंवादासाठी...
रात्रीचा निःशब्द अंधारच आधार असतो
दिवसाच्या कोलाहलपूर्ण वातावरणात
गुणगुणत नसतात दुःखं कधीच !
जीवनाच्या बागेतील...
सलणारी आणि सुखावणारी
प्रत्येक गोष्ट आम्हास प्रिय आहे
आम्ही काटयांपासूनही वाचवत नाहीच स्वतःला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
शाखा (स्थल प्रत)

जुल्फ बिखराके सूरत छुपाते नही
हम कमाले नजर आजमाते नही

सामने आईना हो तो दीदार हो
वैसे जल्वा कभी यूँ दिखाते नही

ये क्या हो गया आजकल आपको
क्यूं अंधेरों मे शम्मा जलाते नही

जो थे आप रंगीन थी कायनात
चाँद-तारे भी अब मुस्कुराते नही

रात होती है अफसानो के वास्ते
दिन के आलम मे गम गुनगुनाते नही

सूफी, गुल्शन की हर शै है प्यारी हमे
हम तो खारों से दामन बचाते नहीं

कशासाठी बोलावतात परत आम्हाला
हे मोसम...
परत का म्हणून
चांदणं जीव जाळू लागलंय
जीवन ! का हे असेच असायचे !
कुठे एखाद्या ठिकाणी...
सुखसमृद्धीने भरभरून ओसंडावे
आणि एखाद्या ठिकाणी
प्रज्वल प्रकाशालाही झोप येऊ नये...
मिटू नयेत थकलेल्या पापण्या
जळत प्रकाशातच असावे...
कोण कुठे तृषार्त आहे
हे मेघांना कसे कळावे ?
ते तर मोसमाच्या नैसर्गिक मस्तीत बरसून गेलेत
ऋतुधर्मानुसार...
पूर्वी केव्हातरी उरात होती
महत्त्वाकांक्षा
धरा आणि नभ यांचे मीलन जिथे घडते
ती क्षितिजरेषा बघण्याची...
पण आज जिथल्या तिथेच आहोत
दैवगतीने जिथे आमचे गतीमान पायच बांधून टाकलेत.
आता मनात... त्या भूतकालीन स्वप्नांच्या छाया
खूपच गहिऱ्या झाल्या आहेत

क्यूँकर हमे फिर मौसम बुलाये
अब चांदनी क्यूँ जी को जलाये

कहीं जिंदगी मे चैनो अलम है
कहीं रोशनी को नींद आ न पाये

बादल क्या जाने कहां कौन प्यासा
मौसम की मस्ती मे बरसी घटायें

कभी आरजू थी देखेंगे हम भी
कहां पर मिले हैं जमीं आसमाँ ये

है बस वहीं हम जहां मिली मंजिल
घने हो गये वो सपनों के सायें

आलीच अखेर ओठांवर
आज ती व्यथा...
मर्यादा सोडून लज्जेच्या
आहेय हृदय केव्हापासूनचे
त्या स्वप्नरात्रीच्या प्रतीक्षेत.
कशी करून घ्यावी सुटका या अस्वस्थपणातून
परमेश्वरा...!
कोणी वाचवावे ! या अशांत हृदयापासून–!
अंतरात जणू काही
जळता निखारा ठेवून दिलाय कोणी
ज्याचा दाह सतत...
शरीर आणि प्राण जाळत असतो
आमच्या डोळ्यांचे अपार आकर्षण, संमोहन
आणि प्रेम आहेय मेघांना
या लहरणाऱ्या सौदामिनीला तरी सांगावे कोणी
अशा अवश अवस्थेत सतावू नये
काही नको विचारूस आमची अवस्था
सूफी,
कुठल्या पाषाणहृदयासाठी...
जीवनातील सारी सुखशांतीच
हरवून बसलोय आम्ही

लाजों के तोड पहरे होठों पे बात आये
दिल कबसे मुन्तजर है ख्वाबों की रात आये

बेचैनियों से हम इन कैसे नजात पायें
इस बेकरार दिल से या रब कोई बचाये

सीनेमे इक सुलगता शोला सा रख दिया हैं
हरदम ही आँच जिसकी है जानोतन जलाये

आँखो से बादलों को है इश्क भी बलाका
इन बिजलियों से कह दो हमको न यूँ सताये

मत पूछिये हमारी हालत ऐ 'सूफी' अब तो
किस संगदिल की खातिर चैनोअलम गँवाये

हे निःश्वास...! हे अश्रू...!
अतिशय प्रिय आहेत आम्हांस
निरतिशय प्रेम वाटते त्यांच्याविषयी
या निःश्वासांच्या या दुःखाश्रूंच्या
फुलांनीच तर खरी, हृदयाच्या बागेत बहार आहे
ओघळतेय अश्रूंच्या प्रवाहात
डोळ्यांतील काजळ... ओघळू...दे...!
किती कोमल मुलायम जाणवतो
अश्रूंचा स्पर्श गालांवर...
जणू काही प्राणप्रियाच्या तळव्यांचा हळुवार स्पर्शच
ही वेदनाच मुळी या मनाचा खरा श्रृंगार आहेय्
त्यांनी द्यावेत...!
खूप द्यावेत...! निःसंकोच द्यावेत !
काट्यांचेच उपहार...
आमच्या पदरात मात्र त्यानेही अविरत...
पुष्पांचाच वर्षाव आहेय
जीवन कसेही असो... कुण्याही अवस्थेत असो, जसेही असो,
प्रीतीचाच करार आहे आमचा जीवनाशी कायम,
जी दुःख देत नाही...सल देत नाही
वेदनांचे निःश्वास देत नाही
अशी प्रीतच मुळी आम्ही अस्वीकार करतो.

अश्क आहों से हमको बहुत प्यार हैं
रंगी फूलों से गुल्शन गुलजार है

नैन कजरा युँ घुलता हैं घुल जाये
इस मनका ये पीडा ही सिंगार हैं

वो सौगात कांटो की देते रहें
आँचल मे गुलों ही की बौछार है

जिस हाल हो, जो भी हो, जैसे हो
जिंदगी से मोहब्बत का इकरार हैं

जो न दे दर्द, ना आह, ना दे कसक
ऐसी चाहत से हमको इन्कार है

तुझे दुःखही मला प्रीय आहे
प्रीतीनेच तर माझ्या गीतांना
वेदनेच्या अलंकारांनी सजवलेय...
निःस्वर एकांताला
ज्यांनी दिलाय स्वर...
त्या निःश्वासांनीच...
अंतरातील गहनतेला
केलेय अधिक गहिरे
त्या निःश्वासांनीच
प्रकृतीतील अंतर्मुखतेला दिलीय तीक्ष्ण संवेदना
निघून जावेसे वाटते
या निर्मोही...
व्यवहारी जगापासून दूर
प्रीतीनेच घातलीय साद परतून
प्रिय–प्रीतीच्या प्रकाशानेच...
प्रकाशमान आहेत प्राणातील दीप
अंतरीची ही विरक्त उदासीनताही
उदासी नव्हेच खरी
अंतरात नित्य वसत असलेल्या
गहिऱ्या शामल संध्येची
पूर्ण यौवना बहार आहे.

हां मुझको तेरा ये गम भी गँवारा है
मेरे नगमात को चाहत ने सँवारा है

हाय तनहाई को जिससे आवाज मिली
आहे बेताब ने तबियत को निखारा है

दिल ने चाहा जमानेसे कहीं दूर चलें
फिर मोहब्बतने पलट मुझको पुकारा हैं

खूब रौशन है चरागाँ नूर से उनके
ये उदासी तो नही शामे बहाराँ है

खूप थकून गेलीय नजर...
तुला शोधून प्रियतमा...
सांजवेळेपासूनच जीव कसा जळू लागलाय
पसरलेत बाहू तुझ्यासाठी मुक्त
येऊन जा...
श्वासांचा प्रवास देखील करणे कठीण झालेय
चार दिवसांचे फक्त हे जीवन...
यौवनाची बहार अस्थायीच
काळ कधी परतत नसतो व्यतीत झालेला
परत येत नसतेच गेलेले आयुष्य कधी
ही यौवनकालची विव्हलताही उरणार नाहीच
कळत नाही...
निघालो होतो कुठून आणि...आलोय कुठे
ज्या स्थैर्य देणाऱ्या केंद्रबिंदूच्या शोधात
निघालो...
कुठे आहेय ते ठिकाण...
कुठे आहेय आम्हास शोध असलेली
ती वाट.

ढूंढकर आपको थक गई हैं नजर
शाम ही से वहुत जल रहा है जिगर

वाहें पसारें है अब आ जाइये
तै न कर पायेंगे साँसभर का सफर

जिंदगी चार दिन है फिजाँ चार दिन
वक्त बीता न आये, न आये उमर

चले थे कहाँ से हम कहाँ आ गये
वो मंजिल कहाँ है वो कहाँ है डगर

अरे
पत्रही लिहिले नाहीस साधे
विचारपूसही केली नाहीस कधी
प्रियतमा...
जाणे कुठल्या दूरच्या प्रदेशात
वास्तव्य केलेस तू जाऊन...
श्रावणाच्या रुपेरी मेघात
तुझ्यासाठी संदेश देऊन
पाठवले...
म्हटले त्याला जा...
प्रियतमाच्या वाटेवर...
खूप बरस जाऊन
सांग माझी व्यथा त्याला
कितीतरी सावळ्या संध्यांचे
देह आणि मनं कोमेजून गेलीत
सांग त्याला...
तुझ्याविना वेडी राधा
वावरी झालीय
तुझ्याविना...
वाटतेय शून्य सांज सावळी
सूने वाटतेय आंगण
सूना वाटतो नदीचा घाट
सूने वाटते मधुबन
सारे नगरच सूने सूने वाटतेय
तुझ्याविना.

तुमने लिखी न पाती हमरी ली न खबरिया
जाके तुम तो बस गये प्रीतम जाने कौन नगरिया

सावनके रुपहले मेंह को देकर एक संदेसा
कहकर भेजा था बरसो रे पी की खूब डगरिया

कितनी शामल संध्याओंके तन और मन कुम्हलाये
कहना उनसे बिना तुम्हारे राधा भई बावरिया

तुमबिन सूनी साँझ सलोनी सूना लागे आँगन
सूना पनघट, सुना मधुबन, सूनी लागे नगरिया,

काय हा चमत्कार...
अनायास हवेत सुगंध मिसळला
अवघी सृष्टीच सुगंधाने दरवळू लागली
स्वतः निर्झर असूनही तृषार्त असलेल्या
नदीला जणू...
मानवी शरीर आणि प्राण प्राप्त होऊन
झाली असावी सजीव साकार
कोणाच्या कृपेचा वर्षाव झालाय...!
कणकण व्यापून बसली जीवनाचा...
ही कोणाची कृपादृष्टी,
साऱ्या हृदयस्थ स्थितींना...
प्राप्त झालेय अपरूप 'लावण्य'
आणि...झाल्यायत
मनोविश्वातील विचार कल्पना 'पाऱ्यागत,' तरल
सतारीची सुरेल सरगम जणू
झालेयत मनःप्राण
झालीयत निःश्वासांची गीतं
विलक्षणच ही अवस्था
मधुर जाणवू लागला आहे
उरातील असह्य 'दाह.'

वो खुशबू धुली हवाओं मे महक गया चमन चमन
पा गया हो रूहो–तन प्यासी किसी नदी का बदन

इनायते किसीकी आज खूब रंग लाई है
हालात हो गये हसीं पारे सा हो गया जहन

सरगम सुरीली जानो तन हो गये सितार की
आह नगमा हो गई मीठी हो गई जलन

अख्ख्या सागराची तृष्णा
कधी शमावी...सांगा
अश्रूचे चार थेंब देऊनच
ते निघून गेलेत
माझ्या पदरातील कळ्या
उमलल्याच नाहीत...
अन काट्यांचा हार देऊन मात्र
ते निघून गेलेत
संपूर्ण आयुष्य काही
मागितलेच नव्हते
फक्त दोन-चार क्षण आयुष्यातील
पण...
एक अवघे आयुष्यच दुःखाचे
देऊन ते निघून गेलेत.

प्रीतीची वेदना...
तरुण होऊ लागलीय
माझी अवस्था आता
स्वतःच बोलू लागलीय
सत्य लपवून कितीही, लपवणे
शक्यच होत नाहीय आता
सत्य स्वतःच डोळ्यांतून
बोलू लागलेय
काय सांगावे...!
धूर उठतोय त्यांच्या घरातून
अन् त्या आगीचे रहस्य मात्र
इथे बोलके होतेय.

प्यास सागर की कैसे बुझेगी कहे
आँसू दो चार देकर चले वो गये

मेरे दामन की कलियाँ खिली ही नही
हार कांटो का देकर चले वो गये

उम्र मांगी नही थी बस दो ही पल
दे के दर्दे-हयात चले वो गये

मोहब्बत की टीसे जवाँ हो रही है
मेरी हालतें अब बयाँ हो रही है

छुपाये छुपा ना सकूँ मै हकीकत
हकीकत निगाहों से बयाँ हो रही है

धुआँ उठ रहा है उनके मकाँ से
यहा राजे-आतिश् बयाँ हो रही है

मन मोहविणारा ऋतू आहे
वातावरण गुलाबी झालेय
अन्...
तुझ्या मीलनाची आकांक्षा ही
तरुण आहे,
ही गहिरी मेघछाया
मधूनच पावसाची रिमझिम
अशावेळी
व्याकूळ दृष्टीला शोध आहे तुझाच
निःश्वास कसे सुगंधयुक्त झालेयत
तू नाहीस...पण......!
माझ्यातच
तुझेही अस्तित्व आहेच

नकाच विचारू...
हे सारे कोणासाठी...
कोणासाठी पाझरताहेत डोळे
कोणी दिलेत आसवांचे मोती
पापण्यांना
कोणी प्रज्वलित केलीय
दीपज्वाला प्राणांत
नकाच विचारू...
कोणी दिलेत हे दुःखाचे अलंकार
कोणामुळे
हृदयातील आकांक्षांना चिरतारुण्य लाभलेय
कोणी दिलंय हे वेगळेपण
प्रकृतीला नकाच विचारू...
हे असे कोणासाठी...

दिल्कश है मौसम समाँ है गुलाबी
तुझसे मिलन की जवाँ आरजू है

बदली घनी ये थम थम फुहारें
निगाहे तलब को तेरी जुस्तजू हैं

आहों मे खुशबू का आलम महकता
मुझमे मुकैयद् तेरा ही वजूँ है

मत पूछिये कि ये किसके लिए हैं
अश्कों के मोती किसके दिए हैं

किसने जलाई है शम्मा जिगर में
जख्मों के जेवर ये किसके दिए हैं

किसकी बनिस्बत जवाँ आरजू हैं
ये तेवर निराले किसके दिए हैं

ये बिखराव, ये भटकन, ये तमन्ना प्यासी
किस साइत पे है कुदरत ने बनाया मुझको

*

अब मेरा गम आवाज का मोहताज नही हैं
तुम पुकारा न करो मुडकर पीछे

*

उल्फते गम का हमारे है बहुत चर्चा
देखिए क्या, क्या, खिलाता है गुल जहां

*

अजनबी रास्तों पे बिखरे गुबारों की तरहां
बेहया से कुछ लम्स चुभे खारों की तरहां

*

बहारों के सायों ने लूटा हमे यूँ
खिजाँ से मोहब्बत का वादा किये है

*

तुम मिले यूँ कि न मिले होते तो अच्छा था

*

आपकी पकड मे आई जो नही शख्सियत हमारी
मतलब ये नही कि शख्सियत ये थी ही न हमारी

*

जानकर हालात वो अनजान बनते हैं
खूब हैं वाकिफ मगर नादान बनते हैं

*

इस पार धुँएँ की चादर उस पार धुँएँ की चादर
लिखें कहानी जलने की अश्क से भर दे सागर

*

मोहब्बत है उनको इबादत की हदतलक
लेकिन अभी नही हैं आसार वस्ल के

*

हमे तो दर्द के आगोश मे डर नही लगता
लगता है, खुशी के पहलू से फिसल जायेंगे

*

बुनियादें हिलती रही फिसलती रही रुहों की सतह
उम्रभर करता रहा कोई दीवारों से जिरह

*

अब कहीं हम पे नजर जमाने की उठी है
जब हमारे दर्द की राहों का मकाम आया है

*

दुआ-सलाम ही तल्क रहा करे गुजर
वल्ला जहे–नसीब कि आमद बनी रहे

*

ये जज्बा, ये हालत, ये अकीदत सनम
है इश्क का सरूर या जादू कोई सनम

*

सद्का उतारिये किसीकी नजर तो ना लगे
किश्ती मेरी ये आपके साहिल पे जा लगे

*

सुबह मिली कभी शाम मिली
तनहा सी कभी रात मिली
सहे तलबको आखिर मे
आवारा इक प्यास मिली

*

खुश्क है मौसम भीग आई है तमन्ना क्यूँ
किस रंज को पाला है न जाने दिलने

*

जिंदगी तबाह होने को आई मगर
हमे होश आया नही अबतल्क

बहुत तनहा था सफर मेरा दी तुमने रवानी
नही कोई था अफसाना दी तुमने कहानी

*

नूर का दरिया हैं आँखे हैं अश्कबार
दे चली है दर्द नये लौटती बहार

*

बात ये ठीक नही है मगर क्या करें
आप होते ही नही है निगाहों से परे

*

आप मिलना तो एक अजूबा था
जान डूबी थी दिल भी डूबा था

*

न बहो ऐ अश्कों तुम्हे गमका वास्ता है
हर लमहा उदासी की एक नई दास्ताँ है

*

न नींद आयेगी न मौत आयेगी
जिंदगी खलाओं मे बिखर जायेगी

उठके चला गया कोई इतने करीब से
वादा निभा रहा हो जैसे रकीब से

*

शबेगम ढली ही नही बादल भी बरसा किया
कोई किसीकी चाह मे ता, उम्र तरसा किया

*

कभी सोचा न था यूँ बेबाक तमन्ना होगी
न तुम मिले तो अपने पे आशनां होगी

*

कहीं भी नही हम कुछ भी नही हम
वहीं हैं, जहां थे, वही गम, वही हम

*

शब जो आती है तो आती है कई सोग लिये
हमने राहों मे जलायें है निगाहों के दिये

*

जहां तक निगाह जाती है बस वही परछाई हैं
तेरी यादों के साये हैं, और मेरी तनहाई है

*

प्यार करना किसीको कितना है खूबसूरत
अफसाना नही झूठा जीने की है जरूरत

तसव्वुर ही को मेरे चाहकर वो बैठें है
हाय, मासूम सा इक गुनाह कर वो बैठें है
जो हकीकत मे मिले तो निगाह उठ न सकी
हमने देखा तो वही शह कर वो बैठें है

*

गर्दिश का हम सफर ये होता नही जमाना
हमने भी यार ऐसे मुश्किल मे आजमाए
मरहम महज लगाना उनको कभी न आया
हमे चोट जाँ पे खाकर हरदम ही मुस्कुराए

*

फिर तेरी याद मेरे दिलमे उभर आई है
जल उठी दर्देशमाँ, लौ भी थरथराई है
फिर निगाहों मे सितारो ने अक्स छोडा हैं
फिर से शब ने वो तडपने की अदा पाई है

हम उनकी आरजू उन्हे है किसी की
अजब है रवानी गमे जिंदगी की
मोहब्बत का मायल है सारा जहां
हर इक की जुदा है, अदा बंदगी की

*

आप आए शुक्रिया, आदाब है, आदाब है
क्या करें पर आज दिलका भी जहां बरवाद है
आज मेरे अंजुमनमे फूल है सूखे हुये
अब फिजाँ की नर्मगोशी का अलग अंदाज है

*

ए, री तनहाइयों, मुझको आवाज न दो
मेरी आखों में सितारों की चमक आ जाये
वा, होश निभाते है जमाने का चलन
तेरी रंजूर सदा दिलके कदम बहकाये

2533
काव्य 20880

मै जिंदगी तबाह कर लूँ तो तुझे क्या
अश्क से निगाह भर लूँ तो तुझे क्या
तुझकों बस अपने गम की खबर है
मै गम में दफ्न हो जाऊँ तो तुझे क्या

*

अश्क बेताब हो तो क्या करे
रूह बेदाग हो तो क्या करे
मचल जाये गर दिले नादाँ
गलत अंजाम हो तो क्या करें

*

खुदा तराश के दिलमे बसा लिया
हाये, किस संग को सनम बना लिया
रहे सिज्दे मे सदा सर को झुकाए
युँ मुहब्बत ही को मजहब बना लिया

*

तेरा जुनूँ मेरी खामोशीको आवाज दिये हैं
तुझसे दूरियाँ पाकर ही अशयार जिये हैं
मेरी तडप और तेरा शोखिए अंदाज मिला कर
उठा के जामें मुहब्बत युँ कुछ घूँट पियें है